(सीएनआर क्र.**MHRG**13000-336-2020)

सारीका सुभाष आंब्रे वि. सुभाष दत्ताराम आंब्रे.

**नि.क्र.५ वर आदेश**.

०१. सदर अर्ज अर्जदाराने अंतरिम पोटगीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह हिंदु धर्मशास्त्र पध्दतीनुसार दिनांक ०४/०१/२०१९ रोजी मंगल मिनी हॉल, गणेश मंदिर, अनंत काणेकर मार्ग, बांद्रे – पुर्व मुंबई येथे एकमेकांचे सहमतीने व नातेवाईकांचे उपस्थितीत पार पाडला. अर्जदार यांचे पहिले पती समीर येरुणकर यांचे बरोबर १० वर्षापुर्वी लग्न झाले होते. सदर पतीच्या छळामुळे त्यांचे वैवाहीक संबंध संपुष्टात आले. त्यानंतर सामनेवाला यांची मुले तन्ही सुभाष आंब्रे व सोहम सुभाष आंब्रे यांचा सांभाळ करण्याच्या उद्देशाने दिनांक ०४/०१/२०१९ रोजी पुर्नविवाह अर्जदार व सामनेवाला यांनी केला.

०२. अर्जदार यांनी पुढे कथन केले की, सदर लग्नानंतर ते दोघेही मुंबई घाटकोपर येथे राहत होते.

०३. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी सामनेवाला यांच्या

मुलांचा आई या नात्याने चांगल्या प्रकारे सांभाळ केला असून त्यांच्या जेवणाखाण्याची योग्य प्रकारे दक्षता घेतली आहे. असे असताना मुलांच्या सांगण्यावरुन सामनेवाला यांच्या गैरहजेरीत मुलांना मारहाण करत असल्याबाबतच्या खोटया तक्रारी मुलांनी सांगितल्याने सामनेवाला याने अर्जदार हिस मारहाण करणे, शारीरिक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली. तसेच अर्जदार हिच्या अंगमासावरुन शिवीगाळी करुन अर्जदाराची मानखंडना सामनेवाला करु लागला.

०४. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, दिनांक २९/०९/२०२० रोजी सामनेवाला यांनी मुलांच्या सांगण्यावरुन मारहाण करुन अर्जदाराच्या चारित्र्यावर नाहक संशय घेवून रात्री ११.०० वाजणेचे सुमारास घरातून हाकलून दिले. अर्जदार हिला उत्पन्नाचे आणि उपजिवीकेचे कोणतेही साधन नसल्याने व स्वतःचा सांभाळ करणे असमर्थ असल्याने कल्याण येथे निघून गेली. त्यानंतर दिनांक ३०/०९/२०२० रोजी कल्याणहून वडशेत वावे, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे त्यांचा आत्या भाऊ मनोहर विनायक सावंत यांच्या घरी गेली व तेथे राहत आहे.

०५. अर्जदार यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला यांच्या मालकीची टुरीस्ट गाडी असून सदर गाडी घाटकोपर येथील फॅक्टरी करता लावलेली

असून त्यास दरमहा रुपये ३० ते ४० हजार इतके उत्पन्न मिळते. तसेच बिल्डींग विकासकाकडून भाडया पोटी दरमहा रुपये ९,५००/– इतकी रक्कम सामनेवाला यास मिळते. सामनेवाला याने लग्नानंतर अर्जदार हिस घर खर्चाकरीता दरमहा रुपये १५ हजार आणून देत असे. त्यामुळे अशा वाढत्या महागाईच्या परिस्थितीत सामनेवाला यांचेकडून दरमहा रुपये १० हजार इतकी अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

०६. सामनेवाला यांनी सदर अर्जावर नि.क्र.१२ कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांची पहिली पत्नी सन २०१४ मध्ये डेंगु या आजाराने मरण पावली. त्यांच्या पत्नीच्या पश्चात मुलांचा सांभाळ सामनेवाला यांची आई करत असे. परंतु सन २०१८ मध्ये त्यांची आई वयोवृध्द असल्यामुळे व आजारपणाने तिचा मृत्यू झाला. त्यामुळे तन्वी आणि सोहम यांची पुर्णपणे जबाबदारी सामनेवाला यांच्यावर पडली. त्यामुळे सामनेवाला यांनी मुलांचे पालनपोषण करण्यासाठी व मुलगी तन्वी वयात आल्यामुळे तसेच दोन्ही मुलांना आईचे प्रेम मिळावे म्हणून सामनेवाला यांनी दुस–या विवाहाचा निर्णय घेतला. त्यावेळी अर्जदार यांच्या नातेवाईकांकडून अर्जदाराचे स्थळ सांगून आले. त्यावेळी अर्जदार हिचा पहिला विवाह १० वर्षापुर्वी

समीर येरुणकर यांच्याशी झाला असून त्यांचा घटस्फोट झालेला होता. तसेच अर्जदार हिला कोणतेही अपत्य नसल्याने सामनेवाला यांनी अर्जदार हिचे सोबत दिनांक ०४/०१/२०१९ रोजी मुंबई येथे नातेवाईकांच्या उपस्थितीत पार पाडला.

०७. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले की, विवाह झाल्यानंतर अर्जदार ही त्यांच्याकडे नांदावयास आली असता सुरुवातीचे काही दिवस त्यांनी सुखाने संसार केला. परंतु काही काळानंतर अर्जदार ही सामनेवाला यांच्या दोन्ही मुलांना छोटया मोठया कारणांवरुन त्रास देवू लागली. सामनेवाला जेव्हा कामानिमित्त बाहेर जात असे तेव्हा अर्जदार ही तन्वी व सोहम यांना कारण नसताना माहरण करुन त्यांना उपाशी ठेवणे असे प्रकार करु लागली.

०८. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला यांनी अर्जदार हिस वेळोवेळी समजावण्याचा प्रयत्न केला असता अर्जदार ही सामनेवाला यांना मी तुझ्यावर न्यायालयामध्ये खोटी केस दाखल करेन, माझ्याकडे हुंडा मागतोस अशी पोलीस केस तुझ्या विरुध्द दाखल करेन अशी धमकी देत असे. सदर बाबींकडे सामनेवाला यांनी आपल्या कुटुंबाची बदनामी होईल या कारणाने दुर्लक्ष केले असता अर्जदार ही सामनेवाला यांचा अधिक छळ करु लागली. सामनेवाला यांनी सदरची

बाब अर्जदार हिच्या माहेरच्या लोकांच्या कानावर घातली असता त्यांनी सदर बाबींकडे दुर्लक्ष केले.

०९. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार ही सामनेवाला यांच्या बरोबर विनाकारण वाद निर्माण करुन जोरजोरात आरडाओरड करुन सोसायटीच्या सर्व लोकांना गोळा करुन त्यांच्या समोर तिच्या हातातील बांगडया फोडत असे. तसेच अर्जदारावर दोन्ही मुलांची जबाबदारी आल्याने चिडचिड करत असे व तो राग मुलांवर काढत असे. तसेच मुलांना बाथरुम मध्ये नेवून कपडे काढून त्यांना बेदम मारहाण करत असे. त्या बाबत सामनेवाला यांनी अर्जदार यांच्याकडे विचारणा केली तर अर्जदार ही जोराचे भांडण करत असे. त्यामुळे सामनेवाला यांनी पुन्हा अर्जदार हिच्या घरच्या लोकांना अर्जदाराचे वागण्याबाबत सांगितले. अर्जदार यांच्या घरच्यांनी फोन द्वारे संपर्क साधून अर्जदार हिस समजावण्याचा प्रयत्न केला तरी देखील अर्जदाराच्या वागण्यात कोणताही बदल झाला नाही.

१०. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार हिने तिचा पहिला पती समीर येरुणकर व तिच्या नातेवाईकांनी त्यांना दमदाटी करुन मारहाण

केल्यामुळे समीर येरुणकर याने अर्जदार हिला घटस्फोट दिला होता ही बाब अर्जदार हिच्याकडून सामनेवाला यास समजली होती. त्यानंतर अर्जदार ही सामनेवाला यास वेळोवेळी 'मी व माझ्या नातेवाईकांनी माझ्या पहिल्या नव–याला धमकी देवून मारहाण केली आहे, तुला पण मी शांत जगू देणार नाही,' अशी धमकी देत असल्याचे कथन सामनेवाला यांनी केले आहे. त्यामुळे सामनेवाला यांनी अनेकदा अर्जदार हिस समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्जदार ही अत्यंत हेकेखोर व हट्टी स्वभावाची असल्याने सामनेवाला यांनी अर्जदार हिच्याशी सामोपचाराची बोलणी केलेली आहे.

११. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, ते मुंबई येथे श्रुती ट्रॅव्हल्समधील वाहनावरती वाहन चालक म्हणून काम करत असून त्यांना दरमहा ९,५००/– रुपये इतका पगार मिळतो. सदर उत्पन्नातूनचे सामनेवाला हा त्यांचा दैनंदिन निर्वाह व दोन्ही मुलांचा शालेय व क्लासचा खर्च भागवणे कठीण असल्याचे कथन केले आहे. तसेच सामनेवाला यांची टाटा इंडिका गाडी ही सन २०१९ मध्येच ३०,०००/– इतक्या रुपयास विकली असून सदरची सर्व रक्कम अर्जदार हिने सामनेवाला यांचेकडून दमदाटी करुन घेतली आहे. तसेच विकास सोसायटी, म्हाडा कॉलनी, घाटकोपर येथील सामनेवाला सदयस्थितीत राहत असलेल्या रुमचे भाडे हे भूविकासक हे परस्पर मालकाला देत असल्याचे कथन केले आहे.

१२. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, मौजे आंब्रेगाव, ता. माणगांव, जि. रायगड येथील जमीन मिळकत ही सामनेवाला यांची वडिलोपार्जीत मिळकत असून त्यामध्ये त्यांच्या सर्व नातेवाईकांचा सामाईक अधिकार आहे. सदरची जमीन मिळकत ही पडीक असून त्यामध्ये कुठल्याही प्रकारची पिके घेतली जात नसल्याचे कथन सामनेवाला यांनी केले आहे. तसेच अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम असल्याचे कथन करुन सामनेवाला व त्यांच्या दोन्ही मुलांनी अर्जदार हिस सन्मानाने वागवल्याचे कथन केले आहे.

१३. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, सामनेवाला हे कामानिमित्त बाहेर असताना अर्जदार ही स्वतःहून दिनांक ३०/१०/२०२० रोजी दुपारी ०१.३० वाजता सोहम यास बेदम मारहाण करुन कोणतीही पुर्व कल्पना न देता घर सोडून गेली. अर्जदार ही सामनेवाला यांच्या पहिल्या पत्नीचे सहा तोळयाचे मंगळसुत्र तसेच लॉकर मधील रुपये ३,०००/–, लॉकरची किल्ली, घराची किल्ली व काही महत्वाची कागदपत्रे सोबत घेवून गेली. त्यामुळे अर्जदार हिस पोटगी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच अर्जदार हिचे गणेश छाया बिल्डींग, देवी दयाळ रोड, विरार पुर्व, मुंबई तसेच मुळ गाव आमशेत गाव, ता. महाड, जि. रायगड या ठिकाणी

माहेर असून तेथे त्यांचे राहते घर आहे. केवळ मा. न्यायालयाची दिशाभूल करण्यासाठी अर्जदार ही तिचे नातेवाईक मोहन विनायक सावंत, रा. वडशेत वावे, ता. श्रीवर्धन येथे राहते.

१४. सामनेवाला यांनी पुढे असे कथन केले आहे की, ते श्रुती ट्रॅव्हल्स वरती काम करत असून त्यांना अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच त्यांनी अर्जदार हिस कधीही मारहाण, शिवीगाळ केलेली नाही. तसेच अर्जदार हिचे स्त्रीधन अथवा कोणतेही कागदपत्रे सामनेवाला यांच्या ताब्यात नाहीत. सामनेवालायांनी अर्जदाराचे दुर्बलतेचा, असहाय्यतेचा कधीही गैरफायदा घेतलेला नूसन अर्जदार हिस कधीही शिवीगाळ, मारहाण करुन शारिरीक हाल, जाच, छळ केला नसल्याचे कथन सामनेवाला यांनी केले आहे. तसेच अर्जदार यांनी सामनेवाला यांच्या विरुध्द कधीही पोलीस ठाण्यात तक्रार केलेली नाही. अर्जदार हिने गैरहेतुने महिलांसाठी असलेल्या कायदयाच्या तरतुदीचा गैरफायदा घेवून सदरचा खोटा व खोडसाळ अर्ज दाखल केला आहे. तसचे अर्जदारस हिस कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदयाप्रमाणे संरक्षाणात्मक आदेश, पोटगी, नुकसान भरपाई इत्यादी मागण्या मागण्यास कोणतेही कारण झालेले नसल्याने अर्जदाराचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्याची विनंती सामनेवाला यांनी केलेली आहे.

१५. दोन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

१६. प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील कथने ही शपथपत्रावर दाखल केलेली आहेत. त्यानुसार सामनेवाला यांनी त्यांचे चारित्र्याबाबत कथने केल्याचे दिसून येते. तसेच सामनेवाला याने शिवीगाळ व मारहाण केल्याचे देखील प्रथमदर्शनी दिसून येते. प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराचे शपथेवरील कथने पाहता तिचा सामनेवाला यांनी शारीरिक तसेच मानसिक स्वरुपाचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. यातील सामनेवाला यांच्या कथनातून अर्जदार यांनी कोणतेही कारण नसताना घर सोडले असे म्हणता येणार नाही. त्यामुळेच अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जाचा विचार करणे आवश्यक आहे. सामनेवाला याने अर्जदार यांची कोणतीही आर्थिक तरतुद केली नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्याने तिला संकटाना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळेच अर्जदार यांना अंतरिम पोटगी मिळणे आवश्यक आहे. यातील सामनेवाला याचे किती उत्पन्न आहे हे दाखवणारा कोणताही पुरावा अर्जदार यांनी अभिलेखावर दिलेला नसल्याने त्यांच्या कथनाप्रमाणे सामनेवालाचे मासीक उत्पन्न एकुण दरमहा रुपये दोन लाख असल्याचा निष्कर्ष काढता येणार नाही. यातील सामनेवाला याने

त्याचे मासीक उत्पन्न ९५००/- रुपये असल्याचे कथन केले असून त्याबाबतचा पगाराचा दाखला म्हणून तो कार्यरत असलेल्या श्रृती ट्रॅव्हल्स या कार्यालयातील दाखला दिलेला आहे. त्यांनी त्याचे इंडिका हे चारचाकी वाहन विकले असल्याचा दिनांक ०७/१२/२०१९ रोजीचा करार दाखल केला आहे. त्याच बरोबर या सन २०२० मध्ये मुलांच्या भरलेल्या शैक्षणिक फी च्या पावत्या देखील दाखल केलेल्या आहेत. सामनेवाला यांनी त्यांच्या मुलाला अर्जदार यांनी मारहाण केल्याबाबतचे फोटो दाखल केले आहेत. सदर फोटो सोबत कोणतेही भारतीय पुरावा कायदा कलम ६५ ब चे प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. तसेच कोणाचेही शपथपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी सदर पुराव्याचे वाचन करता येणार नाही. या प्रकरणी सामनेवाला यांनी दाखल केलेल्या दाखल्या व्यतिरिक्त अन्य कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने त्याचे मासिक उत्पन्न रुपये ९५००/- इतके असल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येईल. या उत्पन्नाच्या आधारे पोटगीची रक्कम निश्चित करणे योग्य होईल. या प्रकरणी अर्जदार हिच्या उदर निर्वाहाकरीता, औषधोपचाराकरीता मासीक रुपये ३०००/- इतका पोटगीचा आदेश करणे योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## :: **आदेश** ::

०१. नि.क्र.५ चे अर्जावर सामनेवाला यांचे विरुध्द सदर अर्जावर अंतिम आदेश होईपर्यंत पुढील आदेश पारित करण्यात येतात.

०२. सामनेवाला याने अर्जदार हिस मासीक रुपये ३०००/– असे अर्ज दाखल तारखेपासून प्रस्तुत प्रकरणाचे अंतिम आदेशापर्यंत दयावे.

०३. सदर आदेशाची प्रत विनामुल्य अर्जदारास देण्यात यावी.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )
दिनांक – १५/१२/२०२०. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन.

Pratik Ganesh Lambe
Final Order
Digitally signed by Pratik Ganesh Lambe
Location: Shriwardhan
Date: 2020.12.16 11:57:48 +0530